VIDYAWARTA®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Special Issue- February- 2020


(Vol- 3

Sahakar Maharshi Late Bhaskaarrao Shingne
Smruti Arogya and Shikshan Prasarak Mandal's

# SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGE ARTS COLLEGE,

KHAMGAON, DIST.BULDHANA (M.S.)

(Affilliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.)



◆ Organizes ◆

One Day Inter Disciplinary National Conference on

# HUMANITIES, CULTURE AND SOCIETY

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Special Issue-03, February 2020

Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne
Smruti Arogya And Shikshan Prasarak Mandal's

**Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College,**
Khamgaon, Dist.Buldhana

**Organizes**
One Day Interdisciplinary National Conference On

## Humanities, Culture And Society

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

41) भारत सरकारचे कॅशलेसचे धोरण
**प्रा. पी. पी. सानप, बुलडाणा** ||140

42) मानवी जीवनात संगीताची भूमिका
**स्वाती किशन इटेवाड** ||141

43) बुलडाणा जिल्ह्यातील कामगार चळवळ इ.स. १९२० ते १९४७ एक ऐतिहासिक विश्लेषण
**डॉ. वसंत डोंगरे,. बुलडाणा** ||143

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचार
**प्रा. डॉ. सिध्दार्थ शिवाजी वाठोरे, वाशिम** ||146

45) मानवी जीवनात संगीताचे महत्व
**प्रा. सुशील अण्णाजी वावरकर, कुंभारी अकोला** ||147

46) मानवी जीवनात संगीताची भूमिका
**प्रा. ज्ञानेश्वर बोंपीलवार, खामगाव** ||149

47) स्वास्थ्यपुर्ण आरोग्यात पोषणयुक्त आहाराचे महत्व
**प्रा. कविता आर. किर्दक, घाटंजी** ||151

48) संत नामदेवाचे सामाजिक कर्तृत्व
**प्रा. कोकाटे के. व्ही., वाशिम** ||152

49) जागतिकीकरण आणि भारतीय कुटुंब संस्था
**प्रा.डॉ. मनोज गं. राठोड, अमरावती** ||155

50) स्वातंत्र्य पूर्व काळातील स्त्री सुधारणा
**प्रा. प्रसन्न बगडे, कुंभारी अकोला** ||156

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

काळात हिराकुंड धरण प्रकल्प राबविला. ओरीसा राज्यातील शेतीला पाणी पुरवठा करता यावा या दृष्टीने त्यांनी हिराकुंड धरण प्रकल्प राबविला. या प्रकल्पामुळे येथील १ लक्ष एकर शेती सिंचनाखाली येणार असा अंदाज होता त्याच प्रमाणे येथे ५० हजार किलोवॅट क्षमतेचा उर्जा प्रकल्प निर्माण होऊ शकणार होता.

**क. नदीजोड प्रकल्प :** आज चर्चिला जाणारा आणि माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात चर्चिला गेलेला नदीजोड प्रकल्प डॉ. आंबेडकरांनी आपल्या काळात राबविण्याचा बेत आखला होता. त्यांच्या मते भारतातील दुष्काळावर मात करण्यासाठी आणि पुराच्या तडाख्यातून तेथील लोकांना वाचविता यावे करिता उत्तर भारतातील नद्या दक्षिण भारतातील नद्यांना जोडण्याची योजना होती. पण काही कारणावरून त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांची ही नदीजोड योजना कागदावरच राहीली. ती प्रत्यक्षात उतरली असती तर दक्षिण भारताला जो कोरडा दुष्काळ पहावा लागतो आणि पाण्यासाठी जे कष्ट उपसावे लागतात ते कमी झाले असते. आणि येथील शेती व्यवसाय संपन्न बनला असता.

**निष्कर्ष :**

डॉ. बाबासाहेबांनी शेतीविषयक विचार त्या काळात मांडले ते आजही तितक्याच प्रमाणत उपयोगाचे आहेत. कारण जमिनीच्या उत्पादकता वाढीसाठी शेतीचे आधुनिकीकरण, सहकारी शेती व जमिनीचा मोठा आकार हे विचार आजही महत्वाचे ठरतात. तसेच आंबेडकरांनी शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी जमीन सुधारणेवर जो भर दिला तो भर आजही दिला आहे. म्हणून आंबेडकरांनी शेतीच्या विकासाशी निगडीत जे मुलभूत विचार मांडले ते आजही तितक्याच किंबहुना त्यापेक्षाही जास्त प्रमाणात भारतीय शेती क्षेत्रास उपयोगी ठरतात. म्हणून भारतीय शेतीच्या परिवर्तनासाठी आजही त्यांचे विचार मार्गदर्शक ठरत आहे हे निश्चित.

**सदर्भ :**

१. सुखदेव थोरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भुमिका व योगदान, सुगावा प्रकाशन पुणे, २००५.

२. डॉ. इंगोले, के एस, बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांचा मागोवा, (ऑक्टोबर २००७) मंगेश प्रकाशन, गिरीपेठ नागपूर - २२

३. अत्रे प्र.के. दलितांचे बाबा. पश्चुरे प्रकाशन मंदीर मुंबई, नववी आवृत्ती २०१०

४. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन मुंबई चौदावी आवृत्ती १९८४

५. डॉ. पानतावणे गंगाधर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवडक लेख. प्रतिभा प्रकाशन पुणे, प्र. आ. १९९८

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे. म.शा.प्र.आ. २००२

**45**

# मानवी जीवनात संगीताचे महत्त्व

**प्रा. सुशील अण्णाजी बावरकर**
सहाय्यक प्राध्यापक, संगीत विभाग,
श्रीगणेशकला महाविद्यालय, कुंभारी अकोला.

"संगीत है शक्ती ईश्वर की, हर स्वर मे बसा है राम,
रागी जोगाये रागीनी, रोगीको मीले आराम".

उपरोक्त विधानानुसार संगीतही ईश्वराने मानवास दिलेली अशी शक्ती वरदान आहेकी, ज्यामुळे मानव आपले जीवन आनंदी, समाधानी आणि सुंदर बनवू शकतो. मानवी जीवनातुन संगीतहे वेगळे होवुच शकत नाही. कारण जीथे जीवन आहे तिथेसंगीतहेआहेच. ही केवळ कवि कल्पना नसुन वस्तुस्थिती आहे. हृदयाची धडधडहा ईश्वर निर्मीत ताल असूनतो वाजण्याचा थांबला की जीवनाची समाप्तीहोते. शरीरातुन रक्ताचासंचार एका विशीष्ट लयीतसुरू असतो. तो जर थोडा देखील थांबला तर, हृदय विकाराचा झटका येवून मानवाचे जीवन संपू शकते. जीवन म्हणजेच चैतन्य, आणि जीथे चैतन्य तीथेसंगीत असणेहा निसर्ग नियमच आहे. मानवाच्या जीवनात संगीत म्हणजेकंठातून उत्पन्न होणारेसुरांचे प्रकटीकरण म्हणजे गायन, वेगवेगळया स्वर ताल वाद्यातुन उत्पन्न होणारे स्वरांचे सादरीकरण म्हणजे वादन, आणि भावमुद्रा, पदन्यास आणि हस्तमुद्रांनी भावभावनांचे होणारेसादरीकरण म्हणजे नृत्य. एकंदरीतसंगीत म्हणजे गायन, वादन आणि नर्तन अंतर्भुत असलेलीकलाहोय. मनुष्यहा गात गातच जन्माला येतो पण त्याच्या या गायनाला आपन रडणे म्हणतो. तो रांगतो, चालतोतेसुध्दा एका विशिष्ट लयीत. बाळ झोपतोसुध्दा आईच्या अंगाइ गीतामूळेच. मानवी जीवनातील प्रत्येककार्यात आपल्याला संगीत पाहायला मिळते. अगदी वाढदिवस, लग्न, मुंज किंवा कुठलेही धार्मीक, सांस्कृतीकवा सामाजीककार्य असो आपनास सनई, ताशा, वाजंत्री अशा सांगीतीककार्यक्रमाची आवश्यकता भासतेच. नव्हे ती आपली आजची अत्यावश्यकगरज झाली आहे.

आज प्रत्येकाला मानसिक शांतता हवी आहे. मणावर पडलेला असाहयकामाचा भार फेकून देणारी शांतता त्याला संगीताद्वारेच प्राप्त होते. अगदी अनुप जलोटांचे भजन असो कि

लता मंगेशकरांचेगाणे, उ. राशिद खान, पं. जसराज यांची मोहमयी आलापी असोकी, पं. रविशंकरांची जादुईसतार किंवा पं. शिवकुमार शर्मा चेसंतुर वादन किंवा हरिहरण, गुलामअली, पंकज उधास, जगजीतसींग यांची गझल असो किंवा बाबूजी सुधिर फडकेंचेगीत असोसारे जग आपले सर्व दुःख विसरून त्या अवर्णनीय आनंदाचा अनुभव घेत असतो. आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा आपल्या कामाचा पहाड उचलण्यासाठीसज्ज होतो. एवढी शक्तीसंगीतात सामावली आहे. त्यामुळेच मानवी जीवनात संगीताला अपरिमीत महत्व प्राप्त झाले आहे.

आज मोठमोठयाहॉटेल मध्ये जेवनाच्या हॉलमध्ये मंद वाद्यसंगीताच्या ध्वनिफीती वाजविल्या जातात. दवाखाना असो कि ऑफीस किंवा शेतीकामाचा ताण हलकाकरणाऱ्याआणि कामाचीक्षमता वाढविणाऱ्या पार्श्वसंगीताचा उपयोगकरण्याची पध्दत जोर धरू लागली आहे. माणूसचकाय पण पशुपक्षी व झाड वेलीवरही संगीताचा पोषक प्रभाव पडू शकतो असे शास्त्रज्ञांनी विविध प्रयोगकरून सिध्द केले आहे. आज अनेक रोगांवर सुध्दासंगीत थेरपी द्वारे रोग निवारण्याच्या विविध पध्दती शोधल्या जात आहे. आणि यावर पुढेसंशोधन चालु आहे. तेंव्हा जीवन आणि संगीत या दांघांना आपन वेगळे काढुच शकत नाही.

मानवाला संगीतापासूनआनंदाची प्राप्तीहोते. आनंदहीसुखाची परमोच्च अवस्था आहे. आनंदहोतो म्हणजेहोतेतरीकायतर मणाला अतीव सुखाची व शांतीची जाणीव होते. संगीताची निर्मीती ओंकारातुन झाली असे म्हणतात. संगीतहे आनंद देतेच परंतु इतरगोष्टी पासून झालेला आनंद व्यक्त करण्यासाठीसुध्दा प्रतिक म्हणूनते वापरले जाते. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर संगीत आपले स्वागत करते. संगीत आनंद देवून जीवन सुसहयकरते. शेतातकामकरतांना शेतकरी लोकगीते म्हणूनतर मोट ओढतांना मोटेवरची गाणी म्हणून शरीर आणि मणावरचा ताण कमीकरीत असतो. खेडेगावात पुर्वी जात्यावर दळतांनास्त्रीयागाणी ओव्या म्हणत असत. शहरात रेडिओ, टेपरेकॉरडर, टि. व्ही, मोबाइल वर गाणी ऐकून शहरी लोक आपला शीन दूर करतात. विद्यार्थी वर्ग सुध्दा आपले मण एकाग्रकरण्यासाठीसंगीताचा आधार घेतात. तर भावीक लोक देवळात जाउन टाळ मृदुंगाच्या साथीने भजनात रंगुन नादब्रम्हात एकरूपहोतात. संगीत सेवनाने मण उल्हासीतहोते. माणसांनाच काय पण देवांनाही संगीतापासून आनंद मिळतो. श्री विष्णू नारदांना सांगतात की, मदभक्ती यत्र गार्यान्ति तत्र तिठामी नारदा आजची वैज्ञानीक प्रगतीसंगीताच्या कक्षा विस्तारीत आहे. संगीताबद्दल जनमानसात आदराची आत्मीयतेची भावना निर्माण झाली आहे. संगीतही आज वैश्विक भाषा झाली आहे. संगीतापासूनमिळणारा आनंदहा अखिल विश्वातील कुठलाही मानूस लुटू शकतो त्याला भाषेची अडचन येत नाही. संगीतातील आनंदहा धर्म, भाषा, जात पात पंथ याच्या पलीकडे नेउन विश्वबंधूतेचा संदेश देते. म्हणुन आपले जीवन सुखीसमाधानी आनंदीकरण्यासाठी प्रत्येकानेचसंगीताची मदत घेतली पाहीजे.

अशा प्रकारे मानवी जीवनात संगीताचे अनन्य साधारण महत्व आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ सुची :**


१. भारतीय संगीत शिक्षण प्रणाली एवं उसका वर्तमान स्तर - डॉ. मधुबाला सक्सेना

२. संगीत विशारद, वसंत, संगीतकार्यालयहाथरस

३. संगीत निबंधावली - संस्कार प्रकाशन

४. आस्वादक संगीतसतीक्षा - श्रीरंगसंगोराम

५. संगीतकला विहार - मासिम पत्रीका


❑❑❑

MAH/MUL/03051/2012
ISSN- 2319 9318

# VIDYAWARTA

विद्यावार्ता

www.vidyawarta.com

Special Issue

ISSN - 2319 9318

(Vol. II) Aug. 2019

International Multilingual Refereed Research Journal

Available Online

An Inter-Disciplinary

## NATIONAL CONFERENCE

On

# Role Of Higher Education In Making India Superpower

21st August 2019

Organized By
Department of Physical Education
and I.Q.A.C.

PEFI

| | | |
|---|---|---|
| 83) | ICT IN HIGHER EDUCATION: OPPORTUNITIES AND CHALLENGES<br>**PROF. SUSHIL WAWARKAR** | 368 |
| 84) | A HEALTHY WAY TO DEVELOP PERSONALITY THROUGH PHYSICAL EDUCATION<br>**DR. VIJAY V. PANDE** | 372 |
| 85) | THE EFFECTIVE ROLE OF SPORTS MANAGEMENT IN HIGH SCHOOL SPORTS<br>**VIKAS ANIL WANKHADE** | 376 |
| 86) | IMPORTANT BENEFITS OF SPORTS FOR YOUTH DEVELOPMENT<br>**PROF. SARJERAO WAGH** | 379 |
| 87) | YOGA: AN ELIXIR FOR HUMAN LIFE<br>**DR. USHA P. YAUL** | 383 |
| 88) | NECESSITY OF PHYSICAL EDUCATION AND SPORTS IN THE PRESENT SENERIO...<br>**DR. VASANT ZENDE, PROF. MADHUKAR WAKALE** | 387 |
| 89) | ROLE OF INFORMATION AND COMMUNICATION TECHNOLOGIES....<br>**DR. BAPPSAHEB MASKE** | 390 |
| 90) | PREKSHA MEDITATION A PART OF YOGA FOR HEALTHY LIFE STYLE<br>**DR. NETAJI MULEY, SHRINIVAS MOTIYELE** | 394 |
| 91) | SUMMER FITNESS TRAINING PROGRAMMES ON STRENGTH<br>**DR. MEENA N. PAWAR** | 398 |
| 92) | SCOPE OF RESEARCH IN YOGA<br>**PROF. LIMBAJI K. PRATALE** | 402 |
| 93) | THE MOTOR NERVE CONDUCTION AND VELOCITY OF ULNAR AND......<br>**DR. SANDEEP JAGTAP** | 406 |
| 94) | उत्कृष्ठ ग्रंथालय आणि उत्कृष्ठ इंटरनेट वाचक अवार्ड रेणुका कॉलेज ग्रंथालयातील....<br>**डॉ. रमणिक एस. लेनगुरे** | 410 |
| 95) | बालगृहातील एक पालक, द्विपालक, अनाथ आणि अन्य किशोरवीन मुलांच्या......<br>**डॉ. अनुरागीणी रमेशराव बोके** | 415 |
| 96) | खेल के माध्यम से बच्चों और युवाओं का स्वास्थ्य विकास<br>**प्रशांत चारजन** | 418 |
| 97) | युवकांच्या विकासात योग साधनेचे योगदान<br>**प्रा. उत्तम रामचंद्र देऊळकर** | 421 |
| 98) | उच्च शिक्षणातील ई लर्निंगचे महत्त्व<br>**डॉ. डि.के. राठोड** | 425 |
| 99) | युवकांच्या विकासामध्ये शारीरिक शिक्षण आणि खेळांची भूमिका<br>**डॉ. किरण व. मोगरकर** | 428 |

83

# ICT IN HIGHER EDUCATION: OPPORTUNITIES AND CHALLENGES

PROF. SUSHIL ANNAJI WAWARKAR
Assit. Prof. Dept. of Music, Shri Ganesh Arts College,
Shivani- Kumbhari, Akola, Mob. 9881477803
Email. sushilwawarkar@gmail.com

**Abstract:**
Higher education systems have grown exponentially in the last five decades to meet the demands of quality education for all. This aspect has further gained momentum due to swift advancements in Information and Communication Technology (ICT). The focus of this paper is to examine the role of Information and Communication Technology (ICT) in higher education in India in the 21st century. The increasing use of information and communication technologies (ICTs) has brought changes to teaching and learning at all levels of higher education systems (HES) leading to quality enhancements in the 21st century. Traditional forms of teaching and learning are increasingly being converted to online and virtual environments. The use of ICT in education not only improves classroom teaching learning process, but also provides the facility of e-learning. ICT has enhanced distance learning in the 21st century. The adoption and use of ICTs in education have a positive impact on teaching, learning, and research.

**Key Words:** Higher Education, Innovative Usage, Digital Resources & Contemporary ICTs.

1. **Introduction:** Information and communication technologies (ICT) have become commonplace entities in all aspects of life. The use of ICT in education lends itself to more student-centred learning settings. Higher education systems have grown exponentially in the last five decades to meet the demands of quality education for all. Demand for skilled and competent labour is ever increasing in the contemporary globalised society. In this backdrop, access to quality in higher education for all has emerged as determining factor of economic growth and development. In order to increase the access to higher education and improving its reach to the remotest parts of the country contribution of open and distance learning facilities is on the increase. In addition, it is catering to life-long learning aspirations and that too at affordable cost. The last two decades have witnessed the inclusion of developments in ICTs in higher education systems around the world

**2.Trends in Growth of Higher Education in India**

Though higher education is very old in India, modern higher education in India began with the establishment of Hindu College in Calcutta in 1817. By 1855, there were 281 High Schools and 28 Colleges. To regulate them, three universities; Bombay, Calcutta and Madras were established in 1857 by then British Indian Government. The growth continued un-impeded and by 1947, there were 19 universities, 496 colleges with 2,40,000 students. University Education Commission, 1948-49 (popularly known as Radhakrishnan Commission) emphasized the need for setting up an apex body to coordinate the growth and development of education at the tertiary level and maintenance of standards in education. Thus, the University Grants Commission (UGC) came into existence by an Act of Parliament in 1956.In the last five half decades, the growth of higher education presents a very impressive picture. There has been commendable quantitative expansion in terms of students' enrolment, number of teachers, colleges, universities and research degrees.

**3. Role of ICT in Higher Education**

Swift growth of ICTs is taking place all over the world. They have emerged as powerful tools for diffusion of knowledge and information. Their introduction and unprecedented use in the higher education has generated varied response. The opportunities can be categorized as the aspects relating to role of ICT for access and equity in education, their role in pedagogy for quality learning and teaching at higher education level and in inducing innovations in approaches and programmes.

**Access and Equity in Higher Education**

Presence of ICT in education sector is increasing steadily. In spite of the fact that education is a social enterprise and teachers are the traditionally mainstay of teaching learning process, ICTs are very powerful tool for diffusing knowledge and information, a fundamental aspect of the education process. ICTs can play enormous role for improving access and equity in education sector in general and higher education sector in particular.11$^{th}$ Plan proposed to achieve the target of 15 percent GER by 2012 through the increase in institutional capacity and increase in 'intake capacity' of existing educational institutions. These efforts are also experiencing the push created in this direction through the consistent rise in enrolment at elementary level and secondary level. The demand for higher education is expected to rise steeply in the forthcoming years under these influences. ICTs lend themselves as an ideal mechanism to bridge this gap by complementing both formal education system as well as distance learning systems (Neeru, 2009). E-learning is emerging as an important strategy to provide widespread and easy access to quality higher education. E-learning is a generic term referring to different uses and intensities of uses of ICTs, from wholly online education to campus-based education and through other forms of distance education supplemented with ICTs in some way. Although, presently the initiatives

for development of e-learning in India are continuing in a sporadic manner, UGC is advocating and making efforts to enhance the quality of higher education by framing policy guidelines for their integration in classroom and other activities.

**4. Innovative Approaches for Teaching**

ICTs have the potential to drive innovative and effective ways of teaching-learning and research. The inclusion of learning tools, easier use of multimedia or simulation tools, easy and almost instant access to data and information in a digital form which allows for computations and data processing generates possibilities which were otherwise not feasible. The possibility to diffuse these innovations and complement the learning content to improve quality in higher education through innovative pedagogic methods is high. The focus on ICTs to back quality research through utilization of rigorous research methodology and in-depth analysis is the call of the hour.

**5. Potential Drawbacks-cum-Challenges to Using ICT in Education**

While using ICTs in education has some obvious benefits, ICTs also bring challenges. First is the high cost of acquiring, installing, operating, maintaining and replacing ICTs. While potentially of great importance, the integration of ICTs into teaching is still in its infancy. Introducing ICT systems for teaching in developing countries has a particularly high opportunity cost because installing them is usually more expensive in absolute terms than in industrialized countries whereas, in contrast, alternative investments (e.g. buildings) are relatively less costly (UNESCO, 2009).

The four most common mistakes in introducing ICTs into teaching are i) installing learning technology without reviewing student needs and content availability; ii) imposing technological systems from the top down without involving faculty and students; iii) using inappropriate content from other regions of the world without customizing it appropriately; and iv) producing low quality content that has poor instructional design and is not adapted to the technology in use (UNESCO, 2009). Although ICT offers a whole lot of benefits there are some risks of using ICT in education which have to be mitigated proper mechanisms. They are:

- It may create a digital divide within class as students who are more familiar with ICT will reap more benefits and learn faster than those who are not as technology savvy.
- It may shift the attention from the primary goal of the learning process to developing ICT skills, which is the secondary goal.
- It can affect the bonding process between the teacher and the student as ICT becomes a communication tool rather than face to face conversation and thus the transactional distance is increased.
- Also, since not all teachers are experts with ICT they may be lax in updating the course content online which can slow down the learning among students.

- The potential of plagiarism is high as student can copy information rather than learning and developing their own skills.
- There is a need for training all stakeholders in ICT.
- The cost of hardware and software can be very high.

**Conclusion**

The increasing use of information and communication technologies (ICTs) has brought changes to teaching and learning at all levels of higher education systems (HES) leading to quality enhancements. Traditional forms of teaching and learning are increasingly being converted to online and virtual environments. The use of ICT in education not only improves classroom teaching learning process, but also provides the facility of e-learning. ICT has enhanced distance learning. The teaching community is able to reach remote areas and learners are able to access qualitative learning environment from anywhere and at anytime. It is important that teachers or trainers should be made to adopt technology in their teaching styles to provide pedagogical and educational gains to the learners. ICT enabled education will ultimately lead to the democratization of education.

**References**

1.Bhattacharya, I. & Sharma, K. (2007). India in the knowledge economy – an electronic paradigm, International Journal of Educational Management Vol. No. 6, pp. 543–568.

2. Cross, M. & Adam, F. (2007). ICT Policies and Strategies in Higher Education in South Africa: National and Institutional Pathways', Higher Education Policy 20(1), 73–95.

3. Mishra, S. & R. C. Sharma (2005). Development of e-Learning in India. University News, 43(11), March 14 – 20, 2005.

4.Neeru, S. (2009). ICT in Indian Universities and Colleges : Opportunities and Challenges, Management and Change, Vol. 13, No. 2, 2009, pp. 231 – 244.

5. UGC (2011). Annual Report 2009 – 10, New Delhi, UGC.

7. UNESCO (2002). Open and Distance Learning Trends, Policy and Strategy Considerations, UNESCO.

8.Mete, Jayanta and Mondal, Ajit (2012) ICT in Higher Education: Opportunities and Challenges, *University of Kalyani, Kalyani, West Bengal*

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Volume - IX, Issue - I,
January - March – 2020
Marathi Part - IV

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

An International
Multidisciplinary
Quarterly
Research Journal

# AJANTA






Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - IV

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३९ | तुकडोजी महाराजांचे आर्थिक विचार<br>**प्रा. डॉ. निता नन्दलाल तिवारी** | १५९-१६३ |
| ४० | राष्ट्रसंतांच्या अभंगातील ज्ञानतत्व<br>**प्रा. डॉ. राजेंद्र मुंढे** | १६४-१६९ |
| ४१ | राष्ट्रसंतांचे खंजेरीच्या माध्यमातुन समाजप्रबोधन<br>**प्रा. सुशील अण्णाजी वावरकर** | १७०-१७२ |

# ४१. राष्ट्रसंतांचे खंजेरीच्या माध्यमातुन समाजप्रबोधन

**प्रा. सुशील अण्णाजी वावरकर**
सहाय्यक प्राध्यापक, संगीत विभाग, श्री. गणेश कला महाविद्यालय, कुंभारी, अकोला.

जनसामान्यांच्या मनावर शिक्षणाचे महत्व बिंबविणारा अस्पृशता नष्ट करून स्वच्छतेचे महत्व सर्व सामाण्य अशिक्षीत लोकांना पटवून देणारा सर्व धर्मांना समान माननारा युगपुरूष म्हणजे वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. त्यांचे संपूर्ण जीवन एक संघर्ष पुर्ण गाथा आहे. त्यांचा जन्म अठराविश्व दारीद्रय असलेल्या कुटुंबात झाला. तरी त्याचे दुःख न मानता पोटाची खळगी भरण्या करीता भजन म्हणून मिळेल ते गोळा करून सुखा समाधानाने राहायचे ही सुरूवातीच्या काळात त्यांची नित्य दिनचर्या असायची . त्यांचे बालपन अत्यंत दारीद्रयात गेले. युवा जिवनाची पाउले देवाच्या शोधार्थ राणीवनी भटकण्यात गेले. आणि युवावस्था प्रोढावस्थेकडे झुकत असतांना त्यांना देवाचे दर्शन जनमाणसामध्ये झाले. आणि मग त्यांनी त्यांचे संपुर्ण जिवनच समाजाच्या उत्कर्षाकरिता वाहून घेतले.

बालपनात विदेही वृत्तीचे असलेले वं. महाराज तारूण्यात मात्र देशालाच देव मानु लागले. ईश्वर दत्त कवित्वशक्ती आणि माधुर्य युक्त खडया आवाजाची देणगी लाभल्यामुळे निर्भीड खंजेरीच्या माध्यमातुन वं. राष्ट्रसंतांनी तळागाळातील समाजासाठी समाजप्रबोधन करून त्यांच्या सर्वांगीन विकासासाठी अविरत प्रयत्न केले.

बालपनापासुनच राष्ट्रसंतांना खंजेरी वादनाबद्दल कुतुहल निर्माण झाले होते. ते शाळेमधून आल्यावर बाजूलाच असलेल्या पंचमुखी शिवमंदीरामध्ये भजनाला जात असत. या मंदिरामध्ये उत्तर प्रदेशातुन आलेले श्री हनवती बूवा अतिशय मधूर व लयकारीयुक्त खंजेरी वादन करीत असत.आणि ईश्वराच्या भक्तीमध्ये तल्लीन होवून तासन तासन भजन करीत असत. बाल तुकडोजी त्या खंजेरीच्या उठावदार बोलाने अगदी बेभान होत असत. तासन तास त्या खंजेरी वादनाकडे एकटक पाहून त्याचे निरीक्षण करीत असत.खंजेरी बद्दल प्रचंड आकर्षन व आवड निर्माण झाल्यामुळे घागरीच्या घनगडीवर कागद चिकटवून खंजेरी सदृष्य वस्तु तयार करून त्यावर बाल तुकडोजी खंजेरी वादनाची तृष्णा भागवित असत. खंजेरी चा नाद त्यांच्या कानामध्ये सतत झंकारत होता.कधीकधी तर हनवती बुवाच्या अनुपस्थीमध्ये चोरून खंजेरी वाजविण्याचा प्रयत्न सुध्दा त्यांनी केला.आणि त्यामुळे त्यांना मार सुध्दा खावा लागला. परंतु या खंजेरी बद्दलच्या प्रेमामुळेच शेवटी त्यांनी खंजेरी वादनामध्ये महारथ प्राप्त केली. आणि खंजेरीच्या माध्यमातुन सामाण्य माणसापासुन तर राजकीय नेत्यांनाही डोलायला भाग पाडले.

वं. महाराजांनी कोणाकडूनही संगीताचे रीतसर शिक्षण घेतले नाही. परंतु संगीताची प्रचंड आवड व संगीताबद्दल असलेली अपरीमीत निष्ठा हयामुळचे त्यांनी खंजेरी भजनाला लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचविले. संगीत वं. महाराजांच्या ह्रदयाच्या गाभाऱ्यात विराजमान होते. जन्मताच गोड गळयाची ईश्वरी देणगी प्राप्त असल्यामुळे व तालावर कमालीचे वर्चस्व प्राप्त असल्यामुळे त्यांच्या खंजेरीमधील केरवा तालाचे बोल उपस्थीतांच्या थेट मणावर प्रतिबिंबीत होत.वं. महाराजांनी जनसामाण्यांच्या मणाचा जवळून अभ्यास केला असल्यामुळे लोकांची माणसीकता

ओळखुन त्यानी आपल्या मधील प्रतिभेच्या साहाय्याने समाजाला जागृत केले. महाराजांना हे लक्षात आले होते की, केवळ भाषणे देवून व्याख्याने देवून किंवा प्रबोधन करून लोकांमध्ये सूधारणा होणार नाही त्यामूळे तळागाळातील ग्रामीण लोकांना जागृत करायचे असेल तर आधी त्यांचे मनोरंजन केले पाहीजे आणि मगच त्यांना आपला लोक सुधारणेचा विषय सांगीतला पाहीजे या विचारानेच वं. राष्ट्रसंतांनी आपल्या खंजेरीच्या थापेने आणि भजनाने जन मानसांवर जणु मोहीनीच टाकली. आणि गावागावामध्ये खंजेरीचा नाद पोहचविला. सर्व सामाण्यांचा आवाज म्हणून वं. राष्ट्रसंतांचे भजन प्रत्येक गावागावामधुन ऐकु येवू लागले.सोबतच वं. महाराज खंजेरी भजनाच्या माध्यमातुन समाज प्रबोधन करू लागले. तबला, संवादिनी, खंजेरी, एकतारी, टाळ इ. सांगीतीक वाद्यांच्या माध्यमाने वं. महाराजांच्या रूबाबदार खडया आवाजाने सर्व लोकांचे खकारल्या जात असे. आणि भजनांच्या मधुनच वं. महाराज जनसामाण्यांना अंधश्रध्दा,रूढी परंपरा यांच्या उच्चाटनाचा मार्ग सांगु लागले. समाजातील व्यसनांधता दुर होण्यासाठी महाराजांनी खंजेरीवर थाप देवून समाजाला उद्देष्युन म्हटले की,

ऐ मानव सुनले बात । व्यसन को छोड दे सारे ।
तेरा और बढेगा नाम । प्यारे नेकी से कर काम ।
व्यसन को छोड दे सारे ।
शराब गांजा पिकर किसने , जिवन सफल बनाया ।
खाक किया है तनको – धनको , आखिर दुर्गती पाया रे।
लाखों का बिगडा ठाठ , उतर गये जय राजा के घाट ।
व्यसन को छोड दे सारे ।

अशाप्रकारे अनेक सामाजीक विषयांवर वंदनीय महाराजांनी विपुल प्रमाणात भजन लेखन केले व ते प्रभावी पणे खंजेरी भजन गायनातुन लोंकापर्यंत पोहचवले. संगीताच्या माध्यमातुनच लोकांपर्यंत सामाजीक विचार पोहचु शकतो हा विश्वास व निष्ठा असल्यामुळेच वं. महाराजांनी खंजेरी भजन हे जंन प्रबोधनाचे साधन म्हणून निवडले. एकतारी वर त्यांची लागणारी ध्यानमुद्रा सुध्दा त्यांची संगीतावर असलेली प्रचंड निष्ठा दर्शविते. खंजेरी वर वं. महाराजांचे अतीव प्रेम होते हयाच खंजेरीने त्यांना शेवट पर्यंत साथ दिली. पंढरपूरच्या शेवटच्या वारीला वं. महाराजांनी खंजरीला हृदयाशी लावून खंजरी चे आभार मानले. व महाराज म्हणाले माझी खरी साथी हिच हिनेच मला पंढरपूर दाखविले.

मेरी रोज बजेगी खंजडी ।

असे म्हणून खंजेरीला शेवटचा नमस्कार केला व खंजरी पांडूरंगापूढे ठेवली.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, वं. राष्ट्रसंतांना संगीताबद्दल आत्यंतीक प्रेम व निष्ठा होती. त्यांनी मृत्य पर्यंत खंजरी ची साथ सोडली नाही. हयाच खंजेरीने वं. महाराजांनी संपुर्ण मानव समाजाला जागृत करून मानवतेची शिकवन दिली आणि समाजप्रबाधनाचे कार्य अविरत केले.

**संदर्भ सुचि**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्तीमत्व – प्रा. रघुनाथ कडवे – अमोल प्रकाशन , नागपूर

२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाड्.मय – डॉ. राजीव बोरकर , अकोला

३. ग्रामगीता – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – श्री गुरूदेव सेवा मंडळ , मोझरी

४. भजन प्रभाव – ग्रामगीताचार्य गुलाब खवसे – राष्ट्रसंत साहीत्य निकेतन, नागपूर

५. संगीत कला विहार – नोव्हें. 2005

६. संगीत विशेषांक – तरून भारत – 1999

७. www.rashtrasanttukdojimaharaj.com